**केंद्र शासन पुरस्कृत "पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (PMSVANidhi)" पुनर्रचित योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : पीएमस्वनिधी-२०२५/प्र.क्र. ४९१/नवि-२०**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: २२ एप्रिल, २०२६

**वाचा :**

१. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. पीएमस्वनिधी-२०२०/प्र.क्र.७७/नवि-२०, दि. १७ जून २०२०
२. केंद्र शासनाचे पत्र क्र. K-१२०२०(६)/७३/२०२५-PMS-B-MoHUA, दि. ११ सप्टेंबर २०२५
३. केंद्र शासनाच्या PM Street Vendors AtmaNirbhar Nidhi (PMSVANidhi) योजनेच्या मार्गदर्शक सूचना.

**प्रस्तावना :**

नागरी भागातील पथविक्रेते असंघटित अर्थव्यवस्थेचा महत्त्वपूर्ण घटक असून नागरिकांना दैनंदिन वापरातील वस्तू व सेवा स्वस्त दरात उपलब्ध करून देण्यासाठी पथविक्रेते मोलाचा वाटा उचलत असतात.

पथविक्रेता (उपजिविकेचे संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम, २०१४ मधील अनुच्छेद २ (१) (१) मध्ये पथविक्रेत्याची सविस्तर व्याख्या देण्यात आलेली आहे.

कोविड-१९ महामारीमुळे पथविक्रेत्यांचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर प्रभावित झाल्याने त्यांना पुन्हा व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक मदतीची आवश्यकता होती.

या पार्श्वभूमीवर, केंद्र शासनामार्फत माहे जून, २०२० मध्ये पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (PMSVANidhi) योजना सुरू करण्यात आली. ही योजना नागरी भागातील पथविक्रेत्यांसाठीची पहिली सूक्ष्मकर्ज योजना आहे. राज्यामध्ये नगर विकास विभाग, शासन निर्णय, दि.१७ जून, २०२० अन्वये या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. केंद्र शासनाकडून या योजनेची पुनर्रचना करून माहे मार्च, २०३० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत व्याज अनुदान व पत हमी यासारख्या लाभांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. तसेच, क्रेडिट कार्डसाठीच्या हमीसाठी माहे मार्च, २०३५ पर्यंत मान्यता देण्यात आलेली आहे.

केंद्र शासनाकडून प्राप्त मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने केंद्र पुरस्कृत PMSVANidhi योजना ही पुनर्रचित स्वरुपात राज्यात राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार, सदर पुनर्रचित योजनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

**शासन निर्णय :**

पथविक्रेत्यांना विशेष सूक्ष्म पतपुरवठा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासन पुरस्कृत पुनर्रचित पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी ही योजना राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जनगणना शहरे (Census Town) यामध्ये राबविण्यास शासन मान्यता देण्यात येत असून त्याबाबत मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे आहेत :

**१. योजनेची उद्दिष्टे :**

पुनर्रचित पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजना ही गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयाद्वारे संचालित असून १००% केंद्र शासन पुरस्कृत आहे. या योजनेची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत :

I. पथविक्रेत्यांची ओळख निर्माण करणे.
II. पथविक्रेत्यांना कर्ज स्वरुपात खेळते भांडवल उपलब्ध करणे.
III. पथविक्रेत्यांना UPI संलग्न क्रेडीट कार्ड उपलब्ध करणे.
IV. पथविक्रेत्यांच्या डिजिटल व्यवहारास प्रोत्साहन देणे.
V. पथविक्रेत्यांची क्षमता बांधणी करणे.
VI. पथविक्रेत्यांना सामाजिक सुरक्षा योजनेशी संलग्न करणे.

**२. लाभार्थी पात्रता निकष:**

नागरी भागात विविध ठिकाणी विक्री करणारे “पथविक्रेते” हे सदर योजनेचे मुख्य लाभार्थी असतील. नागरी स्थानिक स्वराज्य संस्था/जनगणना शहरे (Census Town) यांचेकडून या योजनेसाठी पात्र पथविक्रेते ओळखण्यासाठी विविध पद्धतींचा वापर करण्यात येईल. या योजनेकरिता लाभार्थी पात्रता निकष खालीलप्रमाणे असतील :

- राज्यातील वैधानिक शहरांकरिता पथविक्रेत्यांना नगर पथविक्रेता समिती (Town Vending Committee (TVC)) किंवा नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (ULB) यांच्याद्वारे विक्री प्रमाणपत्र (Certificate of Vending (CoV)) किंवा ओळखपत्र किंवा शिफारसपत्र (Letter of Recommendation-LoR) प्राप्त होणे आवश्यक आहे.
- राज्यातील शहरे (Census Town) किंवा परिघीय शहरी भाग (Peri-Urban Areas) या करिता संबंधित गट विकास अधिकारी यांचे “परिशिष्ट अ” नुसार पडताळणी करून प्रदान केलेले शिफारस पत्र (LoR) प्राप्त होणे आवश्यक आहे.
- या योजनेकरिता पथविक्रेत्यांकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर पडताळणी करून संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था / गट विकास अधिकारी हे १५ दिवसांत शिफारस पत्र (LoR) प्रदान करतील.

**३. योजनेतील घटक :**

**३.१ खेळते भांडवली मुदत कर्ज (Working Capital Term Loans) :**

पथविक्रेत्यांना तारणमुक्त (Collateral-Free) खेळते भांडवली कर्ज तीन टप्प्यांत उपलब्ध करून दिले जाईल :

१. प्रथम कर्ज टप्पा (1st Tranche Loan)
- कर्ज रक्कम: ₹ १५,००० पर्यंत
- परतफेड कालावधी: १२ महिने

२. द्वितीय कर्ज टप्पा (2nd Tranche Loan)

- कर्ज रक्कम: ₹ २५,००० पर्यंत
- परतफेड कालावधी: १८ महिने

३. तृतीय कर्ज टप्पा (3rd Tranche Loan)

- कर्ज रक्कम: ₹ ५०,००० पर्यंत
- परतफेड कालावधी: ३६ महिने

पथविक्रेत्यांनी विहित मुदतीपूर्वी किंवा विहित मुदतीत कर्जाची परतफेड केल्यास ते पुढील टप्प्याचे कर्ज घेण्यास पात्र ठरतील. तसेच, पथविक्रेत्यांनी विहित मुदतीपूर्वी कर्ज परतफेड केल्यास त्यांना कोणताही दंड (Prepayment Penalty) आकारला जाणार नाही.

### ३.१.१ व्याज दर (Rate of Interest) :

- Scheduled Commercial Banks (SCBs), Co-operative Banks आणि SHG Banks यांचे व्याजदर त्यांच्या प्रचलित व्याजदराप्रमाणे असतील.
- NBFC, NBFC-MFIs इत्यादींच्या बाबतीत व्याजदर हे संबंधित कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्थेच्या प्रवर्गासाठी लागू असलेल्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) च्या मार्गदर्शक सूचनांनुसार असतील.
- या योजनेमध्ये MFIs (non-NBFC) आणि इतर कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्था ज्या RBI च्या मार्गदर्शक सूचनांमध्ये येत नाहीत, त्यांच्यासाठी व्याजदर हे NBFC-MFIs साठी लागू असणाऱ्या RBI च्या विद्यमान मार्गदर्शक सूचनांनुसार लागू राहतील.

### ३.१.२ व्याज अनुदान (Interest Subsidy):

या योजनेंतर्गत कर्जाचा लाभ घेणाऱ्या पथविक्रेत्यांनी विहित कालावधीमध्ये कर्जाची परतफेड केल्यास ते ७% व्याज अनुदान मिळण्यास पात्र राहतील. व्याज अनुदानाची रक्कम अर्जदाराच्या बँक खात्यात तिमाहीप्रमाणे (तीन महिन्याच्या अंतराने म्हणजेच एका वर्षातून चार वेळा) जमा केली जाईल. प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये ३० जून, ३० सप्टेंबर, ३१ डिसेंबर आणि ३१ मार्च रोजी संपणाऱ्या तिमाहीला कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्था/ बँका व्याज अनुदानासाठी मागणी/दावा सादर करतील.

NPA नसलेल्या, विहित कालावधीत नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्या व RBI च्या मानकानुसार असलेल्या संबंधितांच्या कर्जखात्यांचा अनुदानासाठी विचार केला जाईल. व्याज अनुदान दि. ३१ मार्च २०३३ पर्यंत उपलब्ध राहील.

### ३.१.३ पत हमी (Credit Guarantee) :

या योजनेंतर्गत वितरीत केल्या जाणाऱ्या कर्जांसाठी Credit Guarantee Fund Trust for Micro and Small Enterprises (CGTMSE) मार्फत ग्रेडेड हमी संरक्षण (Graded Guarantee Cover) उपलब्ध राहील :

- प्रथम कर्ज टप्प्यासाठी - ३१.८७% हमी
- द्वितीय कर्ज टप्प्यासाठी - ८.२५% हमी
- तृतीय कर्ज टप्प्यासाठी - ६% हमी

या योजनेंतर्गत प्रत्येक कर्ज देणाऱ्या संस्थेद्वारे देण्यात आलेले कर्ज पत हमीसाठी गृहीत धरले जाईल.

कर्ज देणाऱ्या संस्थांना हमी दावे करण्याचा कालावधी तिमाही असेल. या पत हमीसाठी कुठलेही शुल्क आकारले जाणार नाही.

### ३.२ क्रेडिट कार्ड :

दुसऱ्या कर्जाची नियमितपणे परतफेड करून तिसरे कर्ज मिळण्यास पात्र झालेल्या पथविक्रेत्यांना UPI-संलग्न RuPay क्रेडिट कार्ड सुविधा दिली जाईल. सदर क्रेडीट कार्ड हे डोमेस्टिक क्रेडीट कार्ड असेल व सदर क्रेडीट कार्डची प्रारंभिक मर्यादा ₹१०,००० असेल, सदर मर्यादा टप्या-टप्याने वाढवून ₹३०,००० पर्यंत करण्यात येईल. सदर क्रेडिट कार्डची वैधता ५ वर्षांसाठी असेल.

### ३.२.१ क्रेडिट कार्ड पतहमी (Credit Guarantee for Credit Card):

क्रेडिट कार्डवरील परतफेडीच्या थकबाकीसाठी CGTMSE मार्फत पतहमी उपलब्ध असेल. या पतहमीचा कालावधी हा क्रेडीट कार्ड जारी केलेल्या दिवसापासून ५ वर्षे किंवा क्रेडीट कार्डची वैधता यापैकी जे आधी संपेल त्या कालावधीसाठी असेल. जास्तीत जास्त २०% NPA पातळी पर्यंत हमी राहील. हमी संरक्षण मर्यादा हि थकबाकी रकमेच्या ७५% पर्यंत, परंतु कमाल ₹३०,००० (किंवा मंजूर मर्यादा) प्रति कार्ड असेल. कार्ड नुतनीकरण करताना कर्जदाता संस्था लाभार्थ्याच्या पत आधारित निर्णय घेऊ शकते.

### ३.३ डिजिटल व्यवहारास प्रोत्साहन (Digital Adoption):

या योजनेंतर्गत डिजिटल पेमेंटचा स्वीकार वाढवण्यासाठी कॅशबॅक प्रोत्साहन दिले जाईल. Digi Saathi / Digi Sakhi, बँका व Digital Payment Aggregators (BHIM, IPPB, Paytm, PhonePe, BharatPe इ.) यांच्या सहकार्याने पथविक्रेत्यांना UPI ID तयार करून देणे, QR कोड प्रदान करणे, डिजिटल प्रशिक्षण देणे, डिजिटल व्यवहारातील अडचणी सोडवणे इ. सेवा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे दिल्या जातील.

पथविक्रेत्यांसाठी कॅशबॅक प्रोत्साहन संरचना खालीलप्रमाणे असेल :

अ. सर्वसाधारण इनवर्ड/आऊटवर्ड डिजिटल व्यवहार:

प्रत्येक कर्ज टप्प्यासाठी प्रति महिना कमाल ₹१०० पर्यंत (प्रति व्यवहार ₹१), प्रति वर्ष कमाल ₹१,२०० पर्यंत लागू असेल.

ब. घाऊक डिजिटल खरेदी:

किमान ₹२,००० च्या डिजिटल घाऊक खरेदीवर प्रति तिमाही ₹१०० पर्यंत (प्रति व्यवहार ₹२० - ५ व्यवहारांपर्यंत), प्रतिवर्ष कमाल ₹४०० पर्यंत लागू असेल.

### ३.४ स्वनिधी से समृद्धि (SSS):

या घटकांतर्गत पथविक्रेत्यांच्या कुटुंबांचे जीवनमान सुधारण्यासाठी त्यांना सुरक्षा प्रदान करण्याकरिता लाभार्थ्यांचे सामाजिक-आर्थिक प्रोफाइलिंग करून केंद्राच्या विविध कल्याणकारी योजनांसोबत त्यांना जोडले जाईल. यामुळे पथविक्रेत्यांच्या कुटुंबाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल.

### ३.५ नागरी पथविक्रेत्यांना सहाय्य (SUSV)

या घटकांतर्गत पथविक्रेता अधिनियम, २०१४ मध्ये नमूद केल्यानुसार पथविक्रेत्यांना उपजीविकेच्या संधी आणि सामाजिक आर्थिक समावेशन वाढविण्यासाठी सर्वांगीण सहाय्य पुरविण्यात येईल. यामध्ये, पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण करणे, विक्री प्रमाणपत्र/ओळखपत्र प्रदान करणे, शहर पथविक्री आराखडा (City Street Vending Plan) अधिसूचित करणे, नाविन्यपूर्ण प्रकल्प राबविणे इ. बाबींचा समावेश असेल.

### ३.६ परिचय फलक (Parichay Boards):

या योजनेतील लाभार्थ्याला स्वनिधी लाभार्थी परिचय फलक (SVANidhi Beneficiary Parichay Board-SBPB) दिला जाईल. हा फलक पथविक्रेत्यांनी आपल्या व्यवसायाच्या ठिकाणी लावावा.

### ३.७ क्षमता बांधणी व संशोधन (Capacity Building & Research):

पथविक्रेत्यांच्या कौशल्यवृद्धी व व्यवसायिक प्रशिक्षणासाठी हा घटक अत्यंत महत्त्वाचा आहे. सदर घटकात खालील बाबी समाविष्ट असतील:

- केंद्र शासनाच्या विविध विभागामार्फत राबविण्यात येणारे उद्योजकता, आर्थिक साक्षरता, डिजिटल साक्षरता, पॅकेजिंग इत्यादी प्रशिक्षण कार्यक्रमासोबत कृतीसंगम साधून पथविक्रेत्यांची क्षमता बांधणी करणे.
- FSSAI सोबत कृतीसंगम साधून अन्न पदार्थ पथ विक्रेत्यांना स्वच्छता व अन्न सुरक्षा प्रशिक्षण देणे.
- नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व इतर भागधारकांसाठी क्षमतावृद्धी प्रशिक्षण/कार्यशाळा/ सेमिनार राबविणे.
- या योजनेचा प्रभावीपणा व शाश्वतता अभ्यासण्यासाठी संशोधन / शैक्षणिक संस्थांद्वारे पथविक्रेत्यांसाठी संशोधन अभ्यास व परिणाम तपासणी (Research & Impact Assessment) प्रकल्प राबविणे.

## ४. भागधारक (Stakeholders):

या योजनेचे भागधारक (Stakeholders) पुढीलप्रमाणे असतील:

१. पथविक्रेते (Street Vendors) आणि त्यांचे कुटुंबीय,
२. नागरी स्थानिक स्वराज्य संस्था,
३. कर्ज देणाऱ्या संस्था (शेड्यूल्ड कमर्शियल बँका (SCBs), प्रादेशिक ग्रामीण बँका (RRBs), स्मॉल फायनान्स बँका (SFBs), सहकारी बँका, NBFCs, मायक्रोफायनान्स संस्था (MFIs) इत्यादी.

या योजनेमध्ये जास्तीत जास्त लाभार्थी समाविष्ट करण्यासाठी कर्ज देणाऱ्या संस्थांकडून त्यांच्या एजंट्स / प्रतिनिधींना प्रोत्साहन दिले जाईल.

त्याचप्रमाणे, योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी खालील संस्थांचेही योगदान महत्त्वाचे राहील :

विविध केंद्रीय मंत्रालये/विभाग, डिजिटल पेमेंट ॲग्रीगेटर्स (DPAs), क्रेडिट कार्ड जारी करणाऱ्या कंपन्या, Quality Council of India (QCI), National Payments Corporation of India (NPCI), Indian Bank (PAiSA Portal), CSC e-Services Limited, Credit Guarantee Fund Trust for Micro & Small Enterprises (CGTMSE), तसेच इतर सहयोगी संस्था इत्यादी.

## ५. मदतीसाठी संसाधन व्यक्ती/हँडहोल्डिंग सहाय्य (Handholding Support):

नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (ULBs) ह्या पथविक्रेत्यांना मदत करण्यासाठी समुदाय संसाधन व्यक्ती (CRP), शिकाऊ विद्यार्थी (Interns), संसाधन व्यक्ती (Resource Persons) चे सहाय्य घेऊ शकतात.

सदर संसाधन व्यक्ती खालीलप्रमाणे कार्य करतील:

I. पथविक्रेत्यांचे अर्ज भरणे, बँकांकडून कर्ज मिळविण्यासाठी सहाय्य करणे आणि परतफेडीसाठी पाठपुरावा करणे.
II. पथविक्रेत्यांना पॅन कार्ड, क्रेडीट कार्ड मिळण्यासाठी व क्रेडिट कार्ड सक्रिय करण्यासाठी सहाय्य करणे.
III. पथविक्रेत्यांच्या डिजिटल व्यवहारास प्रोत्साहन देणे.

पथविक्रेत्यांना मदत करणाऱ्या संबंधित संसाधन व्यक्तींना प्रोत्साहन भत्ता (Incentive) दिले जाईल. सदर प्रोत्साहन भत्ता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमधील स्थायी कर्मचारी किंवा PM SVANidhi साठी कार्यरत तात्पुरते कर्मचारी यांना लागू राहणार नाही.

## ६. माहिती, शिक्षण आणि संवाद (IEC) :

योजनेबाबतची योग्य माहिती विविध भागधारकांपर्यंत विशेषत: लक्ष्यित लाभार्थी म्हणजेच पथविक्रेत्यांपर्यंत स्पष्ट, प्रभावी आणि आकर्षक पद्धतीने पोहोचणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी ब्रँडिंग (Branding) महत्वाचे आहे.

योजनेचा प्रसार आणि जागरूकता वाढवण्यासाठी स्थानिक माध्यमे (रेडिओ, केबल टीव्ही, स्थानिक वृत्तपत्रे), सोशल मीडिया (Facebook, WhatsApp, YouTube, Instagram), या माध्यमांचा प्रभावी वापर करून पथविक्रेत्यांपर्यंत योजना पोहोचवाव्यात.

## ७. लाभार्थी सहभाग आणि भागधारकांचा सन्मान (Beneficiary Engagement and Stakeholder Recognition Mechanism) :

योजनेचा लाभ पूर्ण क्षमतेने आणि सर्वव्यापी पद्धतीने पोहोचावा यासाठी “Whole-of-Government Approach” स्वीकारला आहे. या दृष्टिकोनातून लाभार्थ्यांशी सातत्यपूर्ण संपर्क, मार्गदर्शन आणि सन्मानासाठी खालील संरचित उपक्रम राबविले जातील:

- **मासिक-लोक कल्याण मेळावे** : या मेळाव्यांतर्गत पथविक्रेत्यांचे सामाजिक-आर्थिक प्रोफाइलिंग करणे, त्यांना संबंधित केंद्र व राज्याच्या विविध कल्याण योजनांशी जोडणे, कर्ज अर्जांची नोंद व प्रक्रिया सुलभ करणे, जलद कर्ज वितरण, डिजिटल ऑनबोर्डिंग (UPI, QR कोड, क्रेडिट कार्ड सक्रियता इ.), आर्थिक साक्षरता व जागरूकता उपक्रम, लाभार्थ्यांना आवश्यक असलेल्या इतर सहाय्यात्मक सेवा संदर्भात उपक्रम राबविण्यात येतील.
- **वार्षिक-स्वनिधी महोत्सव** : हा महोत्सव नागरी स्थानिक स्वराज्य संस्था/जिल्हा मुख्यालय या ठिकाणी आयोजित करण्यात येईल. यामध्ये, पथविक्रेत्यांचा, त्यांच्या कुटुंबीयांचा व पाल्यांचा गुणगौरव करण्यात येईल. या महोत्सवात पथविक्रेते, त्यांचे कुटुंब आणि इतर भागधारक यांच्यात अनौपचारिक संवाद व परस्परसंबंध वाढविण्यावर भर देण्यात येईल.
- **वार्षिक-स्वनिधी स्वाभिमान पुरस्कार** : या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये उत्कृष्ट योगदान देणाऱ्या भागधारकांचा हे पुरस्कार देउन गौरव करण्यात येईल.

## ८. एकत्रित माहिती तंत्रज्ञान अनुप्रयोग (Integrated IT Application) :

या योजनेचे संपूर्णपणे ऑनलाईन प्रणालीद्वारे संचलन आणि निरीक्षण करण्यात येईल. कर्ज प्रक्रिया, माहिती प्रवाह, प्रस्तावांचे परीक्षण, मंजुरी यांसारखी सर्व कामे एकात्मिक माहिती तंत्रज्ञान मंचावर (Integrated IT Platform) केली जातील. केंद्र शासनाच्या गृह निर्माण व शहरी कार्य मंत्रालयाद्वारे विकसित करण्यात आलेल्या वेब पोर्टल व मोबाईल ॲपचा या योजनेच्या अंमलबजावणीसाठी वापर करण्यात येईल. एकात्मिक माहिती तंत्रज्ञान मंचामध्ये पथविक्रेत्यांची माहिती, कर्ज देणाऱ्या संस्था, डिजिटल पेमेंट ॲग्रीगेटर्स, गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयाद्वारे विकसित केलेले PAiSA पोर्टल आणि Small Industries Development Bank of India (SIDBI) द्वारे विकसित केलेले Udyami Mitra Portal यांचे एकत्रीकरण असेल.

## ९. अंमलबजावणी यंत्रणा :

१. पीएमस्वनिधी योजनेच्या पुनर्रचित (Restructured) स्वरूपातील सर्व घटकांची ओळख करून देण्यासाठी राज्य, जिल्हा आणि ULB स्तरावर उद्घाटन बैठक (Kick-off Meeting) आयोजित केली जाईल. या बैठकीत पुढील भागधारक सहभागी होतील: राज्य शासनाचे अधिकारी, नगर पथविक्रेता समितीचे सदस्य, बँक प्रतिनिधी, पथविक्रेते संघटनांचे प्रतिनिधी, संसाधन व्यक्ती, इतर संबंधित संस्था.

२. राज्य स्तरावर “राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष” स्थापन करण्यात येईल, आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय हे या योजनेसाठी “राज्य अभियान संचालक” म्हणून काम पाहतील. तसेच, नगरपरिषद प्रशासन संचालनालयातील सह आयुक्त हे “राज्य समन्वय अधिकारी” म्हणून काम पाहतील.

३. जिल्हा स्तरावर “जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष” स्थापन करण्यात येईल, जिल्हा सह आयुक्त (नगरपालिका प्रशासन) हे “जिल्हा समन्वय अधिकारी” म्हणून काम पाहतील. जनगणना नगरांसाठी संबंधित तालुक्याचे गट विकास अधिकारी हे “गट समन्वय अधिकारी” म्हणून काम पाहतील.

४. नागरी स्थानिक स्वराज्य संस्था स्तरावर “शहर अभियान व्यवस्थापन कक्ष” स्थापन करण्यात येईल, महानगरपालिकांच्या बाबतीत पथविक्रेत्यांशी संबंधित विभागाचे काम पाहणारे महानगरपालिका उपायुक्त तर नगरपरिषद/नगरपंचायतींच्या बाबतीत मुख्याधिकारी हे “शहर प्रकल्प अधिकारी” म्हणून कामकाज पाहतील.

५. या योजनेच्या अंमलबजावणीचा तसेच कर्ज प्रकरणे व क्रेडीट कार्ड बाबतच्या कामगिरीचा नियमित आढावा राज्य स्तरावर राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष व राज्यस्तरीय बँकर्स समिती यांच्याद्वारे घेण्यात येईल. जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी किंवा जिल्हा सह आयुक्त हे जिल्ह्यातील नगरपरिषदा/नगरपंचायती/जनगणना नगरे (Census Town) व संबंधित बँक यांचा आढावा घेतील. तसेच महानगरपालिका स्तरावर महानगरपालिका आयुक्त किंवा शहर प्रकल्प अधिकारी (महानगरपालिका उपायुक्त) हे आपल्या अधिनस्थ अधिकारी/कर्मचारी व बँक यांचा नियमित आढावा घेतील.

या योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या वित्तीय सेवा विभाग (DFS) यांच्याकडून मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यस्तरीय बँकर्स समिती (SLBC) मार्फत कर्ज देणाऱ्या संस्था/बँका यांचा नियमित आढावा घेण्यात येईल. या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय बँकर्स समिती स्वतंत्र यंत्रणा विकसित करेल.

१०. **अंमलबजावणी संस्था (Implementing Agencies) :**

सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुढील संस्था प्रमुख भूमिकेत कार्य करतील:

- **भारतीय लघु उद्योग विकास बँक (SIDBI) :**
  गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालय (MoHUA) यांच्या वतीने PM SVANidhi योजनेची अंमलबजावणी यंत्रणा म्हणून **भारतीय लघु उद्योग विकास बँक** कार्य करेल. SIDBI आपले नेटवर्क आणि पुढील कर्जदाते संस्थांचे जाळे वापरून योजनेचे संचालन करेल: शेड्यूल्ड कमर्शियल बँका (SCBs), प्रादेशिक ग्रामीण बँका (RRBs), स्मॉल फायनान्स बँका (SFBs), सहकारी बँका, NBFCs, मायक्रोफायनान्स संस्था (MFIs), डिजिटल पेमेंट ॲग्रीगेटर्स (DPAs) व क्रेडिट कार्ड जारी करणाऱ्या संस्था इत्यादी. योजनेशी संबंधित डेटा व्यवस्थापन, प्रगती निरीक्षण, समन्वय आणि तांत्रिक सहाय्य या कामांचे नेतृत्व सुद्धा SIDBI करेल.
- **इंडियन बँक (PAiSA Portal व्यवस्थापक) :**
  PAiSA पोर्टल हे कर्ज देणाऱ्या संस्थांना व्याज अनुदान दावे (Interest Subsidy Claims) सादर करण्यास मदत करेल. लाभार्थ्यांच्या खात्यात व्याज अनुदानाची थेट जमा प्रक्रिया (Direct Benefit Transfer-DBT) सुलभ करेल. कर्ज, परतफेड आणि व्याज अनुदानाच्या तांत्रिक पडताळणीतही सहाय्य करेल.

११. **योजनेच्या मार्गदर्शन व देखरेखीसाठी समित्या (Committees for Steering & Monitoring of the Scheme) :**

या योजनेची प्रभावी अंमलबजावणी, प्रगतीचा नियमित आढावा आणि समन्वय करण्यासाठी राज्यस्तर, जिल्हास्तर व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था स्तरावर अनुक्रमे सोबतच्या परिशिष्ट “ड”, परिशिष्ट “इ” व परिशिष्ट “ई” मध्ये नमूद केल्यानुसार समित्यांची स्थापना करण्यात येत आहे. या समित्या योजनेतील घटकांचे नियोजन, अंमलबजावणी, निरीक्षण आणि सनियंत्रण करतील.

जिल्हास्तरावरील सन्मा. संसद सदस्य यांच्या अध्यक्षतेखालील “District Development Coordination and Monitoring Committee (DISHA)” समिती यांचेकडून देखील या योजनेचा आढावा घेण्यात येईल.

गृह निर्माण व शहरी कार्य मंत्रालय यांच्याकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने या योजनेच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना राज्य अभियान संचालक यांनी वेळोवेळी निर्गमित कराव्यात.

यापुढे गृह निर्माण व शहरी कार्य मंत्रालय यांच्याकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सूचनांच्या अनुषंगाने नव्याने निर्माण होणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा समावेश या योजनेमध्ये करण्यासाठी ही योजना शहरी भागातील पथविक्रेत्यांकरिता असल्याने आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय हे “राज्य अभियान संचालक” म्हणून सक्षम प्राधिकारी राहतील.

सदर शासन निर्णय ग्राम विकास व पंचायतराज विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४२२१७५१३१४२२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANILKUMAR R UGLE

Digitally signed by ANILKUMAR R UGLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Urban Development Department,
2.5.4.20=1D265DC74C98F72F41F5A1403DB16525E09E7DE2E336C366DE3A32EA2A050A8A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8BBD8635D43D23F28021156F38051619258C51238668F40D15D3209EA39554AA, cn=ANILKUMAR R UGLE
Date: 2026.04.22 17:53:48 +05'30'

**(अनिलकुमार रा. उगले)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई.
४) मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक कल्याण आणि औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय मुंबई.
५) मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.
६) मान.संसद सदस्य (सर्व) / मान.विधीमंडळ सदस्य (सर्व)
७) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय , मुंबई.
१०) प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायतराज विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर, नवी मुंबई.
१२) विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व).
१३) जिल्हाधिकारी (सर्व)
१४) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
१५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१६) विभागीय सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन (सर्व)
१७) जिल्हा सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन (सर्व)
१८) मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपंचायती (सर्व)
१९) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०) निवडनस्ती (नवि-२०)

: परिशिष्ट "अ":

## जनगणना शहरे (Census Town) आणि परिघीय शहरी भाग (Peri-Urban Areas) यातील पथविक्रेत्यांना शिफारस पत्र प्रदान करण्याबाबतची प्रक्रिया.

PM SVANidhi योजनेचा उद्देश शहरे "विकास केंद्रे (Growth Hubs)" म्हणून विकसित करणे हा आहे. यासाठी या योजनेत शहर-प्रदेश दृष्टिकोन (City-Region Approach) स्वीकारण्यात आला आहे. या योजनेंतर्गत जनगणना शहरे, परिघीय शहरी भाग (Peri-Urban Areas) समाविष्ट करण्यात येत आहे.

**१. पात्र पथविक्रेत्यांची ओळख करण्याचे निकष:**

I. पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम, २०१४ मधील "पथविक्रेता" व्याख्येनुसार, वस्तू/सेवा विक्री किंवा पुरविण्याचा व्यवसाय करणारे.

II. पथविक्रेता हा हंगामी किंवा वर्षभर व्यवसाय करणारा असू शकतो.

III. पथविक्रेता हा फिरता (Mobile) किंवा स्थिर (Stationary) दोन्ही प्रकारचा असू शकतो.

IV. पथविक्रेता संबंधित जनगणना शहर किंवा परिघीय शहरी भागात व्यवसाय करत असावा.

**२. शिफारस पत्र (Letter of Recommendation-LoR) मंजुरी प्रक्रिया:**

I. जनगणना शहरे आणि परिघीय भागांसाठी LoR संबंधित गटाचे गट विकास अधिकारी (BDO) यांच्याकडून मंजूर केले जाईल.

II. गट स्तरावर अर्ज प्रक्रिया दोन टप्प्यांत केली जाईल:

a. **पडताळणी (Verification):** प्राप्त अर्जांची पडताळणी करण्यासाठी गट समन्वय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली व ग्रामपंचायतचे ग्राम विकास अधिकारी/ग्रामसेवक, जिल्ह्यामार्फत नामनिर्देशित गट स्तरीय संघ किंवा ग्रामपंचायत स्तरीय संघ यांचे प्रतिनिधी मिळून समिती गठीत करून सदर समितीमार्फत पडताळणी प्रक्रिया पूर्ण केली जाईल.

b. **मंजुरी (Approval):** पडताळणी समितीच्या शिफारशीवर आधारित LoR मंजूर करून गट समन्वयक अधिकारी (BDO) यांच्याद्वारे LoR उपलब्ध करून देण्यात येईल.

III. संपूर्ण प्रक्रिया PMS पोर्टल (Udyami Mitra Platform) द्वारे ऑनलाइन पद्धतीने केली जाईल.

**३. कर्ज मिळविण्याची प्रक्रिया:**

- गट विकास अधिकारी (BDO) यांच्याकडून LoR मंजूर झाल्यानंतर, पथविक्रेत्यांचा अर्ज स्वयंचलितपणे (पोर्टलद्वारे) बँकेकडे पाठविला जाईल.
- त्यानुसार, योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बँक कर्ज प्रक्रिया पूर्ण करेल.

## : परिशिष्ट “ब”:

## योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची यादी.

| Sr.No. | District Name | ULB Name |
|---|---|---|
| 1 | Ahilyanagar | Ahilyanagar Municipal Corporation |
| 2 | Ahilyanagar | Akole Nagarpanchayat |
| 3 | Ahilyanagar | Deolali Pravara Municipal Council |
| 4 | Ahilyanagar | Jamkhed Municipal Council |
| 5 | Ahilyanagar | Karjat Nagarpanchayat |
| 6 | Ahilyanagar | Kopargaon Municipal Council |
| 7 | Ahilyanagar | Nevasa Nagarpanchayat |
| 8 | Ahilyanagar | Parner Nagarpanchayat |
| 9 | Ahilyanagar | Pathardi Municipal Council |
| 10 | Ahilyanagar | Rahta Pimplas Municipal Council |
| 11 | Ahilyanagar | Rahuri Municipal Council |
| 12 | Ahilyanagar | Sangamner Municipal Council |
| 13 | Ahilyanagar | Shevgaon Municipal Council |
| 14 | Ahilyanagar | Shirdi Nagarpanchayat |
| 15 | Ahilyanagar | Shrigonda Municipal Council |
| 16 | Ahilyanagar | Shrirampur Municipal Council |
| 17 | Akola | Akola Municipal Corporation |
| 18 | Akola | Akot Municipal Council |
| 19 | Akola | Balapur Municipal Council |
| 20 | Akola | Barshitakli Nagarpanchayat |
| 21 | Akola | Hiwarkhed Municipal Council |
| 22 | Akola | Murtijapur Municipal Council |
| 23 | Akola | Patur Municipal Council |
| 24 | Akola | Telhara Municipal Council |
| 25 | Amravati | Achalpur Municipal Council |
| 26 | Amravati | Amravati Municipal Corporation |
| 27 | Amravati | Anjangaon Municipal Council |
| 28 | Amravati | Bhatkuli Nagarpanchayat |
| 29 | Amravati | Chandur Municipal Council(Amravati) |
| 30 | Amravati | Chandurbazar Municipal Council |
| 31 | Amravati | Chikhaldara Municipal Council |
| 32 | Amravati | Daryapur Banosa Municipal Council |
| 33 | Amravati | Dattapur Dhamangaon Municipal Council |
| 34 | Amravati | Dharni Nagarpanchayat |
| 35 | Amravati | Morshi Municipal Council |
| 36 | Amravati | Nandgaon Khandeshwar Nagarpanchayat |
| 37 | Amravati | Shendurjana Municipal Council |
| 38 | Amravati | Tiwsa Nagarpanchayat |
| 39 | Amravati | Warud Municipal Council |
| 40 | Beed | Ambajogai Municipal Council |
| 41 | Beed | Ashti Nagarpanchayat |
| 42 | Beed | Beed Municipal Council |

| | | |
|---|---|---|
| 43 | Beed | Georai Municipal Council |
| 44 | Beed | Kaij Nagarpanchayat |
| 45 | Beed | Kille Dharur Municipal Council |
| 46 | Beed | Majalgaon Municipal Council |
| 47 | Beed | Parli Municipal Council |
| 48 | Beed | Patoda Nagarpanchayat |
| 49 | Beed | Shirur Kasar Nagarpanchayat |
| 50 | Beed | Wadvani Nagarpanchayat |
| 51 | Bhandara | Bhandara Municipal Council |
| 52 | Bhandara | Lakhandur Nagarpanchayat |
| 53 | Bhandara | Lakhani Nagarpanchayat |
| 54 | Bhandara | Mohadi Nagarpanchayat |
| 55 | Bhandara | Pauni Municipal Council |
| 56 | Bhandara | Sakoli Municipal Council |
| 57 | Bhandara | Tumsar Municipal Council |
| 58 | Buldhana | Buldana Municipal Council |
| 59 | Buldhana | Chikhli Municipal Council |
| 60 | Buldhana | Deulgaon Raja Municipal Council |
| 61 | Buldhana | Jalgaon - Jamod Municipal Council |
| 62 | Buldhana | Khamgaon Municipal Council |
| 63 | Buldhana | Lonar Municipal Council |
| 64 | Buldhana | Malkapur Municipal Council(Buldhana) |
| 65 | Buldhana | Mehkar Municipal Council |
| 66 | Buldhana | Motala Nagarpanchayat |
| 67 | Buldhana | Nandura Municipal Council |
| 68 | Buldhana | Sangrampur Nagarpanchayat |
| 69 | Buldhana | Shegaon Municipal Council |
| 70 | Buldhana | Sindkhed Raja Municipal Council |
| 71 | Chandrapur | Ballarpur Municipal Council |
| 72 | Chandrapur | Bhadravati Municipal Council(Chandrapur) |
| 73 | Chandrapur | Bhisi Nagarpanchayat |
| 74 | Chandrapur | Brahmapuri Municipal Council |
| 75 | Chandrapur | Chandrapur Municipal Corporation |
| 76 | Chandrapur | Chimur Municipal Council |
| 77 | Chandrapur | Gadchandur Parishad Municipal Council |
| 78 | Chandrapur | Ghugus Municipal Council |
| 79 | Chandrapur | Gondpimpri Nagarpanchayat |
| 80 | Chandrapur | Jiwati Nagarpanchayat |
| 81 | Chandrapur | Korpana Nagarpanchayat |
| 82 | Chandrapur | Mul Municipal Council |
| 83 | Chandrapur | Nagbhid Municipal Council |
| 84 | Chandrapur | Pombhurna Nagarpanchayat |
| 85 | Chandrapur | Rajura Municipal Council |
| 86 | Chandrapur | Saoli Nagarpanchayat |
| 87 | Chandrapur | Sindewahi Nagarpanchayat |
| 88 | Chandrapur | Warora Municipal Council |
| 89 | Chhatrapati Sambhajinagar | Chhatrapati Sambhajinagar Municipal Corporation |
| 90 | Chhatrapati Sambhajinagar | Fulambri Nagarpanchayat |

| | | |
|---|---|---|
| 91 | Chhatrapati Sambhajinagar | Gangapur Municipal Council |
| 92 | Chhatrapati Sambhajinagar | Kannad Municipal Council |
| 93 | Chhatrapati Sambhajinagar | Khuldabad Municipal Council |
| 94 | Chhatrapati Sambhajinagar | Paithan Municipal Council |
| 95 | Chhatrapati Sambhajinagar | Sillod Municipal Council |
| 96 | Chhatrapati Sambhajinagar | Soyagaon Nagarpanchayat |
| 97 | Chhatrapati Sambhajinagar | Vaijapur Municipal Council |
| 98 | Dharashiv | Bhum Municipal Council |
| 99 | Dharashiv | Dharashiv Municipal Council |
| 100 | Dharashiv | Kalamb Municipal Council |
| 101 | Dharashiv | Lohara (Bk) Nagarpanchayat |
| 102 | Dharashiv | Murum Municipal Council |
| 103 | Dharashiv | Naldurg Municipal Council |
| 104 | Dharashiv | Paranda Municipal Council |
| 105 | Dharashiv | Tuljapur Municipal Council |
| 106 | Dharashiv | Umarga Municipal Council |
| 107 | Dharashiv | Washi Nagarpanchayat |
| 108 | Dhule | Dhule Municipal Corporation |
| 109 | Dhule | Dondaicha-Warwade Municipal Council |
| 110 | Dhule | Pimpalner Municipal Council |
| 111 | Dhule | Sakri Nagarpanchayat |
| 112 | Dhule | Shirpur-Warwade Municipal Council |
| 113 | Dhule | Sindhakeda Nagarpanchayat |
| 114 | Gadchiroli | Aheri Nagarpanchayat |
| 115 | Gadchiroli | Armori Municipal Council |
| 116 | Gadchiroli | Bhamragad Nagarpanchayat |
| 117 | Gadchiroli | Chamorshi Nagarpanchayat |
| 118 | Gadchiroli | Desaiganj (Wadsa) Municipal Council |
| 119 | Gadchiroli | Dhanora Nagarpanchayat |
| 120 | Gadchiroli | Etapalli Nagarpanchayat |
| 121 | Gadchiroli | Gadchiroli Municipal Council |
| 122 | Gadchiroli | Korchi Nagarpanchayat |
| 123 | Gadchiroli | Kurkheda Nagarpanchayat |
| 124 | Gadchiroli | Mulchera Nagarpanchayat |
| 125 | Gadchiroli | Sironcha Nagarpanchayat |
| 126 | Gondia | Amgaon Municipal Council |
| 127 | Gondia | Arjuni Nagarpanchayat |
| 128 | Gondia | Deori Nagarpanchayat |
| 129 | Gondia | Gondiya Municipal Council |
| 130 | Gondia | Goregaon Nagarpanchayat |
| 131 | Gondia | Sadak-Arjuni Nagarpanchayat |
| 132 | Gondia | Salekasa Nagarpanchayat |
| 133 | Gondia | Tirora Municipal Council |
| 134 | Hingoli | Aundha Nagnath Nagarpanchayat |
| 135 | Hingoli | Basmath Municipal Council |
| 136 | Hingoli | Hingoli Municipal Council |
| 137 | Hingoli | Kalamnuri Municipal Council |
| 138 | Hingoli | Sengaon Nagarpanchayat |

| | | |
|---|---|---|
| 139 | Jalgaon | Amalner Municipal Council |
| 140 | Jalgaon | Bhadgaon Municipal Council |
| 141 | Jalgaon | Bhusawal Municipal Council |
| 142 | Jalgaon | Bodwad Nagarpanchayat |
| 143 | Jalgaon | Chalisgaon Municipal Council |
| 144 | Jalgaon | Chopda Municipal Council |
| 145 | Jalgaon | Dharangaon Municipal Council |
| 146 | Jalgaon | Erandol Municipal Council |
| 147 | Jalgaon | Faizpur Municipal Council |
